# महापौर बंगल्याचे नवे टेंडर अखेर रद्द

## रितू तावडेंच्या निर्णयावर किशोरी पेडणेकरांनी केली जोरदार टीका

राजेश जायस्वाल | ६ ऑगस्ट




सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

मुंबई: मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी त्यांच्यावर होत असलेल्या आरोपांवर स्पष्टीकरण दिलं आहे. महापौर बंगल्याच्या कामासाठी 2 कोटी 89 लाखाचं टेंडर काढण्यात आल्याची चर्चा होती. त्यावर आता मुंबई महापालिकेचं वादग्रस्त टेंडर मागे घेण्याचे महापौरांनी आदेश दिले आहेत. महापौरांनी पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली. हे काम भायखळा येथे राणीच्या बागेचं होतं. पण महापौर बंगल्याचा चुकून यामध्ये उल्लेख झाला. या सगळ्यामुळे हे टेंडर मागे घेण्याचे आदेश मी दिलेले आहेत, असं महापौर रितू तावडे यांनी सांगितलं. टेंडरवर जे शीर्षक होतं, त्यावरुनच हा सर्व वाद निर्माण झाला. महापौरांना सतत प्रश्न विचारले जात होते. अपग्रेडेशन ऑफ हेरिटेज बंगलो असं त्या टेंडरचं शीर्षक होतं. त्यामुळे हे काम महापौर बंगल्याचं की, राणीच्या बागेचं हे स्पष्ट होतं नव्हतं. वारंवार प्रश्न विचारल्यानंतर महापौरांनी चूक मान्य केली. साऊंड बॅरियर लावले जाणार होते. हे सगळं काम राणीच्या बागेचं होतं. पण महापौर बंगल्याचा संबंध जोडून फेक नरेटिव पसरवण्यात आलं, असं महापौर रितू तावडे म्हणाल्या. विरोधकांकडे कुठलेही मुद्दे राहिलेले नाहीत. किशोरी पेडणेकरांना रात्रंदिवस महापौरचं दिसतात. आदित्य ठाकरे यांनी सुद्धा ट्वीट केलं. त्यांनी अभ्यास करून स्टेटमेंट करायला हवं होत. आदित्य ठाकरे यांच्या बुद्धीची सुद्धा कीव येते. यांनी जो 25 वर्ष घोटाळा केलाय तो बाजूला करण्याचा काम आम्ही करतोय, असं रितू तावडे म्हणाल्या. एक फेक नेरेटिव्ह पसरवला जातोय की महापौर बंगल्यासाठी आणखी खर्च केला जातोय. महापौर बंगला हेरिटेजकडे येतो. ही टेंडर प्रोसेस बंगल्याच्या अख्त्यारीत येत नाही. महापौर नाव जोडलं की मायलेज त्यांना मिळतो. आपली दुकानं उबाठा पक्ष चालवतोय. 2 कोटी 89 लाखाचा टेंडर काढलाय ते राणी बाग झू उद्यान विभागाकडून टेंडर काढलाय. हेरिटेज कडून काढलेला नाही.


सिटी न्यूज सुपरफास्ट
रस्त्यांवरचे खड्डे चालतील, पण बंगला चकाचक
महापौर बंगल्यासाठी 3 कोटींचे नवे टेंडर
राजेश जायस्वाल ५ ऑगस्ट
मुंबई: मुंबईच्या महापौरांनी मंजूर केलेला बंगल्यावरील खर्च पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. बायकुला येथील महापौरांच्या बंगल्यावरील खर्चाचा आकडा समोर आला असून, तो सातत्याने वाढत असल्याचे दिसून येत आहे. बंगल्याचे महापौर नवीन रहमानलू यांनी दुरुस्ती आणि विविध कामांसाठी सुमारे ७५ लाख रुपये खर्च केले असतील. त्यानंतर स्थायी समितीने सुमारे ३.५० कोटी रुपयांच्या नूतनीकरण प्रस्तावाला मंजुरी ... कोटी रुपयांची नवीन निविदा मागवण्यात आली आहे. या कामांमध्ये ध्वनीरोधक पॅनेल, पावसाच्या पाण्याचे आणि ... बंगल्यावर कोट्यवधी रुपये खर्च झाल्यानंतर, आता पुन्हा सुमारे तीन कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात येत असून या ... रुपयांची निविदा! दरम्यान, एप्रिल २०२६ मध्ये बंगल्याच्या नूतनीकरणाला मंजुरी मिळाल्यानंतर, मुंबई महानगरपालिकेने बाहेरील आवारातील विविध निवास सुविधांसाठी आणखी २ कोटी ८९ लाख रुपयांकरिता सुमारे ३ कोटी ४० लाख रुपयांची निविदा काढली आहे. किंवा सध्या सुरू असलेल्या कामांमध्ये पटनवाला रोडखालील वाहतुकीचा आवाज कमी करण्यासाठी ध्वनीरोधक उभारणे, नळपाणी आणि पावसाच्या पाण्याचे कालवे टाकणे, इतर भूमिगत ...

### किशोरी पेडणेकर यांनी केली टीका!

» टेंडर मी ही वाचतेय हेरिटेज बंगलो असं लिहलंय. त्या बंगल्याजवळ अनेक बांधकामं झाली आहेत. अधिकारी अशा चुका कशा करू शकतात? महापौरांना अडचणीत कोण आणतय? महापौर बंगल्याच्या जवळ बॅरिकेड लावण्यात येतात, तर महापौर बंगल्यापासून किती तरी अंतरावर प्राणी आहेत तरी बॅरिकेडची संकल्पना चांगली आहे. टेंडर मागे घेण्यावरून तुमची बालबुद्धी दिसते, अशी टीका विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी केली.

# बृहन्मुंबईत पादचारी प्रथम अभियान; पदपथ अडथळामुक्त करण्याचे आयुक्तांचे आदेश

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट



मुंबई : पदपथांवरील अनधिकृत फेरीवाले व अतिक्रमणे तत्काळ हटवून पदपथ अडथळामुक्त करण्यासाठी 'पेडेस्ट्रियन फर्स्ट' अभियान बृहन्मुंबईत प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी नुकतेच दिले आहेत. या अभियानाची पाहणी करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी पश्चिम उपनगरातील के पश्चिम आणि पी दक्षिण विभागात आज सकाळी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

विलेपार्ले परिसरातील स्वामी विवेकानंद मार्गावरून रामगणेश गडकरी मार्गाद्वारे कूपर रुग्णालयाकडे मोठ्या प्रमाणात रुग्णांची व रुग्णवाहिकांची ये-जा असते. तसेच, या मार्गावरून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची देखील मोठ्या प्रमाणात ये-जा असते. त्यामुळे, या मार्गावरील अतिक्रमण हटविण्यासाठी प्राधान्य देण्यात आले आहे. पेडेस्ट्रियन फर्स्ट अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यात ३२० किलोमीटर लांबीच्या पदपथांवरील अतिक्रमण संपूर्णतः हटवून नागरिकांना सुलभ चालता यावे, यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या अनुषंगाने, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी विलेपार्ले (पश्चिम) परिसरात रामगणेश गडकरी मार्ग आणि स्वामी विवेकानंद मार्गे (एस. व्ही. रोड) परिसरात पदपंथांची आज प्रत्यक्ष पाहणी केली. या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात के. पश्चिम विभागातील एकूण ३५५ मार्गांपैकी २७ मार्ग हाती घेण्यात आले आहेत. या २७ मार्गांवरील ३७.७ किलोमीटर इतके अंतर अतिक्रमणमुक्त करण्यात येत आहेत. पदपथांवरील अनधिकृत फेरीवाले, अतिक्रमणे व इतर सर्व प्रकारचे अडथळे तत्काळ हटवून पदपथ पूर्णपणे अडथळामुक्त करावेत. तसेच, पदपथांची सुधारणा, सुशोभीकरण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे सक्त निर्देश महानगरपालिका आयुक्त भिडे यांनी दिले.

यावेळी सह आयुक्त (परिमंडळ-४) डॉ. भाग्यश्री कापसे, उपायुक्त (आयुक्त कार्यालय) प्रशांत गायकवाड, सहायक आयुक्त (पी दक्षिण विभाग) कुंदन वळवी आदी उपस्थित होते.

# झुल्फीकार बेहलीम व त्याच्या साथीदारां विरोधात मोक्का कायद्यांतर्गत कारवाई



प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

**मुंबई** : बांद्रा पोलीस स्टेशन अंतर्गत शस्त्र अधिनियम अन्वये कुख्यात गुंड झुल्फीकार बेहलीम, त्याचा भाउ मोहसीन बेहलीम व इतर १० साथीदार अशा १२ आरोपीविरुध्द मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. या गुन्हयाचा तपास युनिट ९, गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडून करण्यात येत असताना या गुन्ह्यातील अटक आरोपी सराईत गुंडप्रवृत्तीचे असल्याचे व त्यांची गुन्हेगारी टोळी असल्याचे निष्पन्न झाले. या आरोपींनी या गुन्ह्याच्या माध्यमातून संघटीत गुन्हेगारी टोळीची दहशत पसरुन टोळी प्रमुख झुल्फीकार यासीन बेहलीम याने स्थानिक परिसरातील व्यावसायिकांमध्ये दबदबा ठेवणे व कंत्राट घेणा-या कंत्राटदारांमध्ये दहशत पसरवून त्यांच्याकडून प्रत्येक कंत्राटाच्या मागे खंडणीची रक्कम प्रोटेक्शन मनीच्या स्वरूपात पैसे मिळविणे तसेच संघटीत गुन्हेगारी टोळीचा आर्थिक फायदा करण्यासाठी केला असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, ०४/०८/२०२६ रोजी, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई यांच्या पुर्वपरवानगीने या गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम २३(१) अन्वये कलम ३ (१) , ३(२), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

# मुंबईतील निर्जन जागी समलिंगी डेट, अचानक टोळक्याने 31 वर्षीय तरुणाची केली लूट

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

मुंबई: पीडित तरुण एका समलिंगी डेटिंग ॲपवर ओळख झालेल्या युवकाला भेटण्यासाठी निर्जन स्थळी गेला होता, त्यावेळी टोळक्याने धाक दाखवून त्याला कपडे काढायला लावले. त्याचे व्हिडिओ शूट करुन पैसे घेऊन पोबारा केला.

डेटिंग ॲपवर ओळख झालेल्या युवकाला भेटायला गेला असताना एका खाजगी कंपनीत प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर म्हणून काम करणाऱ्या ३१ वर्षीय तरुणाला लुटल्याचा प्रकार समोर आला आहे. मुंबईतील देवनार भागात ३० जुलै रोजी ही घटना घडली. पीडित तरुणाला या टोळीने आधी कपडे काढायला भाग पाडले, मारहाण केली, धमकावले आणि ५० हजार रुपये लुटून पोबारा केला.

संबंधित तरुण एका डेटिंग ॲपवर ओळख झालेल्या तरुणाला भेटण्यासाठी तिथे गेला होता, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिल्याचं वृत्त आहे. त्या तरुणाला भेटायला आलेली व्यक्तीही या गुन्ह्यात सहभागी असावी, असा संशय तपास अधिकाऱ्यांना आहे.

देवनार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण हा प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर म्हणून काम करतो. तो शिवाजी नगर येथील रहिवासी असून त्याचे कार्यालय वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स(बीकेसी) येथे आहे.

३० जुलै रोजी एका डेटिंग ॲपवर त्याची एका व्यक्तीशी ओळख झाली; दोघांनी एकमेकांचे नंबर घेतले आणि काही काळ चॅटिंग केल्यानंतर देवनारमधील एका निर्जन ठिकाणी भेटण्याचे ठरवले.

"समलिंगी ॲपवर भेटलेल्या तरुणासोबत असतानाच काही अज्ञात व्यक्ती तिथे आल्या. त्यांनी तरुणाला चाकूचा धाक दाखवला

# 9 वर्षापासून वाँटेड आरोपीस अटक

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

मुंबई : ९ वर्षांपासून वाँटेड आरोपीस कर्नाटक आणि गोवा राज्यात शोध घेऊन अटक केली. एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीमध्ये ०३/०२/२०१७ रोजी फिर्यादी अब्दुल मोहसीन शेख राहणार सांताक्रुझ (पश्चिम) मुंबई यांना त्यांचा भाऊ वसीउल्ला मोहसीन शेख व नातेवाईक समशुद्दीन शेख यांना चिन्का नावाच्या इसमाने फोन करून भेटण्याच्या बहाण्याने भंगारवाडी, सुभाषनगर, एम.आय.डी.सी अंधेरी (पुर्व), मुंबई येथे बोलाविले होते. तेथे एका भंगार गाळयात त्यांना जेवणासाठी म्हणून नेले त्या ठिकाणी सोहबराव यांची वसीउल्लाने पोलिसांना खबर दिल्याचा राग मनात धरून आरोपी मोहबतअली उर्फ चिंन्का, सोहराब, फिरोज, साबीर अली व दोन अनोळखी इसमांनी बेदम मारहाण केली. वसीउल्ला मोहसिन शेख व समशुद्दीन शेख यांना घेराव घालून लोखंडी सळई व लोखंडी पाईपने जबर मारहाण करून, हातापायाची व शरीराची हाडे मोडून गंभीर दुखापत केली. तसेच फिर्यादीचा भाऊ वसीउल्ला मोहसिन शेख यास ठार मारले म्हणून एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदवण्यात आला होता. गुन्हयात सहभागी असलेले एकुण ६ आरोपींना गुन्हा घडल्यांनतर तात्काळ अटक करण्यात आली होती. तर



गुन्हयातील आरोपी मेहताब आलम अझिमतुल्ला खान याचा शोध घेवून देखील सापडला नाही. फरार आरोपीताबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून प्राप्त करून तसेच त्याचे मित्र व नातेवाईक याचे कडून मिळालेल्या माहितीचा सहानिशा करून, सदर माहितीचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. आरोपी मेहताब आलम अझिमतुल्ला खान, वय-४६ वर्षे हा सध्या कर्नाटक व गोवा या राज्यामध्ये वास्तव्यास असल्याचे तपासात निष्पन्न झाले. ०२/०८/२०२६ रोजी निगराणी पथकाने कर्नाटक व गोवा राज्यामध्ये सलग दोन दिवस पाठलाग केला. ०३/०८/२०२६ रोजी आरोपी हा राष्ट्रीय ध्रुवीय एंव समुद्री अनुसंधान केंद्र, वास्को, गोवा या ठिकाणी स्क्रॅप उचलण्यासाठी जात असल्याचे माहिती प्राप्त झाली. त्यावर नमुद ठिकाणी जावून पाळत ठेवून स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपीस ताब्यात घेतले.

# 8 कोटी खंडणी मागणाऱ्या तिघांना अटक

## 10 लाख घेताना गुन्हे शाखेचा सापळा



प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

ठाणे : ठाण्यातील एका नामांकित बांधकाम व्यावसायिकाकडून तब्बल ८ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हे शाखा, घटक-१ ने तिघांना अटक केली आहे. खंडणीच्या १० लाख रुपयांच्या पहिल्या हप्त्याची रक्कम स्वीकारताना पोलिसांनी रचलेल्या सापळ्यात हे आरोपी रंगेहात अडकले. या कारवाईत १० लाख रुपयांची रोख रक्कमही जप्त करण्यात आली. कळवा येथील बांधकाम व्यावसायिक सौरभ नंदकुमार साळवी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, केशव हाइट्स इमारतीच्या मालकीसंदर्भातील वादात नोटरीच्या आधारे ईडी, सीबीआय, आर्थिक गुन्हे शाखा तसेच न्यायालयात तक्रारी करून अडचणीत आणण्याची धमकी आरोपींकडून देण्यात येत होती. या तक्रारी मागे घेण्यासाठी आणि इतर विभागांकडे तक्रारी न करण्याच्या मोबदल्यात विविध खात्यांमध्ये सुमारे साडेचार कोटी रुपये खर्च होतील, तसेच उर्वरित प्रकरण 'लीगल' करण्यासाठी आणखी चार कोटी रुपये द्यावे लागतील, अशी एकूण ८ कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता. या तक्रारीची गंभीर दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गुन्हे शाखा, घटक-१ ला कारवाईचे आदेश दिले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे व त्यांच्या पथकाने तक्रारदाराला व्हॉइस रेकॉर्डर उपलब्ध करून दिला. त्यामध्ये आरोपींकडून खंडणीची मागणी होत असल्याचे संभाषण रेकॉर्ड झाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला. ३० जुलै रोजी पारसिकनगर, कळवा येथील तक्रारदाराच्या कार्यालयात आरोपी १० लाख रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारण्यासाठी आले असता, गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये संतोष मनोहर बावडेकर (४७), सिद्धेश हरीशचंद्र बेंडकोळी (३५) आणि इम्तीयाज इलियास मोमीन (३१) यांचा समावेश आहे. या प्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५३/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०८(२), ३०८(३), ३०८(६) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने तिन्ही आरोपींना ७ ऑगस्ट २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे करीत आहेत.

# पावसाचा चकवा, एल निनो असतानाही वाढते पाऊसमान!

## हवामान खातेही बुचकळ्यात, अलर्टबाबत उडाला गोंधळ

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

मुंबई: प्रादेशिक हवामान विभागाने मुंबईमध्ये हलक्या ते मध्यम सरींचा अंदाज वर्तवलेला असताना पश्चिम उपनगरांमध्ये मंगळवारी रात्रीनंतर पावसाचा जोर थोडा वाढला. यासोबत प्रादेशिक हवामान विभागाचा अंदाजही वर-खाली होताना दिसला.

सकाळी ९ वाजता दिलेल्या अंदाजामध्ये मुंबईमध्ये मध्यम सरींची शक्यता वर्तवली होती, ठाण्यात गुरुवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला, तर १२.३४ वाजताच्या अंदाजानुसार मुंबई, तसेच ठाण्यालाही बुधवारी यलो अलर्ट अद्ययावत करण्यात आला. त्यानंतर १२.५६ वाजता दिलेल्या अंदाजानुसार मुंबईचा यलो अलर्ट मागे घेण्यात आला. रायगडचा बुधवारसाठीचा ऑरेंज अलर्ट अद्ययावत करून 'यलो' करण्यात आला आणि गुरुवारसाठी ऑरेंज अलर्ट करण्यात आला.

मुंबईवर बुधवारी सकाळच्या सुमारास पावसाळी ढग दिसत असल्याची माहिती काही हवामान अभ्यासकांनी दिली. या ढगांमुळे तुरळक ठिकाणी पावसाचा जोरही अधिक होता. दहिसर अग्निशमन दल केंद्र येथे २८ मिलीमीटर, तर जोगेश्वरीच्या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा रुग्णालय येथील केंद्रावर २५.२ मिलीमीटर पावसाची नोंद सकाळी ८.३० ते रात्री ८.३० या १२ तासांमध्ये झाली. उर्वरित बहुतांश केंद्रांवर ५ ते १० मिलीमीटर पावसाची नोंद झाली. मात्र या ढगांमुळे प्रादेशिक हवामान विभागाने मुंबईला यलो अलर्ट दिला असेल, असे काही हवामान अभ्यासकांनी सांगितले. मात्र हा अलर्ट काही मिनिटांमध्ये मागे घेण्यात आला.

# मोठ्या आवाजात गाणी लावण्यावरुन विक्रोळीत सख्ख्या भावाचा दादाच्या कुटुंबावर हल्ला, बापलेकाचा मृत्यू

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

**मुंबई:** पहाटेच्या सुमारास मोठ्या आवाजात गाणी लावण्यावरुन झालेल्या भांडणातून ही घटना घडली. पिता आणि मोठा मुलगा यांचा उपचारादरम्यान करुण अंत झाला, तर आई आणि धाकटा मुलगा जखमी आहेत.मुंबई पूर्व उपनगरातील विक्रोळी येथे बापलेकाची हत्या झाल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे सख्ख्या भावानेच मोठा भाऊ आणि पुतण्याचा खून केल्याचा आरोप आहे. पहाटेच्या सुमारास मोठ्या आवाजात गाणी लावण्यावरुन झालेल्या भांडणाचं पर्यवसान चाकू हल्ल्यात झालं. पिता आणि मोठा मुलगा यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर आई आणि धाकटा मुलगा जखमी आहेत. या घटनेने विक्रोळी परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

विक्रोळी पार्कसाईट परिसरात थरारक घटना गुरुवार ६ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास पार्कसाईट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विक्रोळी (पश्चिम) येथील राहुल नगरमध्ये प्राणघातक चाकू हल्ला झाला. यामध्ये सुनील विश्वकर्मा (४०) आणि त्यांचा मुलगा श्लोक विश्वकर्मा (१४) हे गंभीर जखमी झाले होते. मात्र राजावाडी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांना मृत घोषित करण्यात आले. सुनील यांच्या पत्नी अंजू विश्वकर्मा आणि धाकटा मुलगा विवान विश्वकर्मा हेसुद्धा चाकू हल्ल्यात जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.प्राथमिक तपासानुसार, एकाच कुटुंबातील तिघा भावांमध्ये वाद होऊन दोघांनी एका भावाच्या अख्ख्या कुटुंबावर धारदार शस्त्राने वार केले. मयत सुनील यांनी पहाटेच्या सुमारास मोठ्या आवाजात गाणी लावली होती.

# गुंगी गुडियावरून राजकारण तापले; एनसीपीचा मंत्रालयाला घेराव

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना 'गुंगी गुडिया' म्हणत काँग्रेसने त्यांच्यावर टीकास्त्र सोडलं होतं. मात्र हे विधान आता काँग्रेसला महागात पडत असून एनसीपीचे नेते कार्यकर्ते प्रचंड भडकले आहेत. नाशिक, पुण्यासह, मुंबईत तसेच राज्यभरात या विधानाचे पडसाद उमटले असून अनेक ठिकाणी आंदोलन झाली. मुंबईतही यावरून एनसीपी आक्रमक झाली असून बुधवार दुपारी मंत्रालयासमोर एनसीपीने आंदोलन केलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्य कर्त्यांकडून मंत्रालय च्या बाजूला असलेल्या महात्मा गांधी च्या पुतळ्या जवळ मूक आंदोलन





सुरू आहे. पोलिसांकडून मात्र या आंदोलनाला परवानगी मिळालेली नाहीये. मात्र तरीही संतापलेले कार्यकर्ते , पदाधिकारी मोठ्या प्रमाणात मंत्रालयाजवळ जमलेले असून वातावरण थोडं तापलेलं दिसलं. पोलिसांकडून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना, आंदोलकांना रोखण्यात आलं.

यावेळी उपस्थित कार्यकर्ते, आंदोलकांनी जोरदार घोषणा दिल्याचं पहायला मिळालं. 'सुनेत्रा वहिनी अगा है, बाकी सब भंगार है', 'गुंगी नहीं है, आँधी है.. आँधी नहीं तूफान आहे', तसेच सुनेत्रा वहिनी आगे बढो, हम तुम्हारे साथ है, अशा विविध घोषणांनी मंत्रालयाजवळचा परिसर दणाणून गेला होता.

पक्षाचे सर्व कार्यकर्ते इथे आले आहेत, अनेक पदाधिकारी उपस्थित असून महात्मा गांधींना अभिवादन करण्यासाठी आम्ही इथे सर्व जमलो आहोत. त्यांनी माफी मागितल्याशिवाय आम्ही आमचं आंदोलन स्थगित करणार नाही. आम्ही महात्मा गांधींच्या चरणांवर पुष्पहार अर्पण करून, काँग्रेसवाल्यांना सद्बुद्धी मिळो अशी प्रार्थना करणार आहो, असं एनसीपीच्या नेत्यांनी सांगितलं.

तर राष्ट्रवादीच्या नेत्या, आमदार ॲडव्होकेट सना मलिक यांही आंदोलनस्थळी उपस्थित होत्या, त्यांनी त्यांचा संताप व्यक्त केला. काँग्रेसने माफी मागितली पाहिजे. आपल्या पक्षातील कोणावरही जर टीका केली, तर मोर्चा काढण्याचा किंवा आंदोलनाचा अधिकारा आम्हाला संविधानानने दिला आहे. काँग्रेसने जाहीर माफी मागितली पाहिजे, हीच आमची मागणी आहे, असं त्या म्हणाल्या. आम्ही फक्त मूक आंदोलन करणार आहोत, आम्ही शांतपणे जाऊन महात्मा गांधींच्या पुतळ्याला अभिवादन करणार आहोत, कायदा कोणीच हातात घेणार नाही, असंही सना मलिक यांनी स्पष्ट केलं. सना मलिक यांनी काँग्रेस पक्षावर निशाणा साधत म्हटले की, कदाचित काँग्रेस पक्ष आपला इतिहास विसरला आहे. एकेकाळी इंदिरा गांधींबद्दल केलेल्या वक्तव्यांना तीव्र विरोध करणारा तोच काँग्रेस पक्ष आता महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रीय राष्ट्रपती सुनेत्रा पवार यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्ये करत आहे. यांनी मागणी केली की, काँग्रेस पक्षाच्या दिल्ली नेतृत्वाने या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट करावी आणि तात्काळ जाहीर माफी मागावी. त्यांनी इशारा दिला की, माफी न मागितल्यास महाराष्ट्रभर आणि देशभरात आंदोलने केली जातील आणि कायदेशीर कारवाईही केली जाईल.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135